**महाराष्ट्र शासन**
राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई (SIAC)
(प्री.आय.ए.एस.ट्रेनिंग सेंटर)
हजारीमल सोमाणी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस समोर, मुंबई ४०० ००१
दूरध्वनी क्रमांक ०२२-२२०७०९४२ Web : www.siac.org.in ई-मेल : siac१९९५@gmail.com

---

जा.क्र.एसआयएसी/२०२५/सूचना/४५३ दिनांक-०३/१०/२०२५

# प्रवेशाच्या अनुषंगाने Status Retention Form भरण्याबाबतच्या आणि Betterment पर्याय निवडण्याबाबतच्या सूचना

## Retention फॉर्मसाठी सूचना -

स्थिती टिकवून ठेवणे: जर एखाद्या उमेदवाराला पहिल्या फेरीत केंद्र वाटप केले गेले असेल आणि जो त्या केंद्रात -**प्रवेश घेणार असेल**, व तो मिळालेल्या **प्रवेशीत पर्यायावर** समाधानी असल्यास, अशा उमेदवाराने दिलेल्या नमुन्यात स्टेटस रिटेन्शन फॉर्म सादर करणे आवश्यक आहे. ज्या उमेदवाराने Status Retention Form (ANNEXURE "A") फॉर्म भरला आहे त्याचा सन 2025-26 साठी निवड प्रक्रियेच्या पुढील कोणत्याही फेऱ्यांसाठी विचार केला जाणार नाही. विहित तारखेपूर्वी ज्या केंद्रावर निवड झालेल्या उमेदवाराला नियमाप्रमाणे प्रवेश दिला गेला आहे. ज्या उमेदवाराने स्टेटस रिटेन्शन फॉर्म जमा (सबमिट) केले आहेत ते उमेदवार पुढील उर्वरित फेरीसाठी पात्र असणार नाहीत. याद्वारे हे स्पष्ट करण्यात येते कि, की स्टेटस रिटेन्शन फॉर्म सबमिट करण्यासाठी दिलेला कालावधी महत्त्वपूर्ण आणि महत्वाचा आहे. अशी स्थिती SIAC-CET 2025-26 सबमिट करणाऱ्या उमेदवारासाठी स्टेटस रिटेन्शन फॉर्म **प्रवेश घेतलेल्या संस्थेकडे** सबमिट करणे बंधनकारक आहे.

## Betterment फॉर्मसाठी सूचना -

उमेदवारांनी पसंतीक्रम फॉर्म भरताना कृपया लक्षात घ्यावे की SIAC-CET 2025-26 गुणवत्ता यादी निवडीच्या प्रत्येक फेरीत राज्य गुणवत्ता क्रमांक एक पासून चालविली जाईल. मागील फेरीत निवड झालेल्या परंतु पसंतीक्रमानुसार केंद्र न मिळालेल्या उमेदवाराचा पुढील फेऱ्यांसाठी Betterment (ANNEXURE "B") फॉर्म **भरुन देणाऱ्या विद्यार्थ्यांचा उच्चतम पर्यायाचा** विचार केला जाईल. यातील महत्वाची बाब म्हणजे उमेदवाराने दिलेला **उच्चतम पसंतीक्रम अथवा प्राधान्यक्रम आहे. दुसऱ्या प्रवेंश फेरीसाठी लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी** Betterment **चा फॉर्म भरुन स्वाक्षरी करुन आपल्या प्रोफाईल मध्ये अपलोड करणे अनिवार्य आहे. सदर कामकाज दि.०९.१०.२०२५ ते ११.१०.२०२५ या कालावधीत आपल्या प्रोफाईल मार्फत पूर्ण करावे.**

तसेच विद्यार्थ्यांनी Betterment Form भरल्यास दुसऱ्या प्रवेश फेरीत विद्यार्थ्यांना उच्चतम Preference न मिळाल्यास पहिल्या प्रवेश यादीतील आपल्याला मिळालेली सीट ही दुसऱ्या प्रवेश फेरीकरीता राखीव करुन ठेवण्यात येईल.

प्रवेश निश्चित करण्याकामी Status Retention Form (ANNEXURE “A”) भरुन न देणाऱ्या तसेच Betterment (ANNEXURE “B”) पर्यायाची निवड न करणाऱ्या विद्यार्थ्यांचा पुढील प्रवेश फेरीसाठी विचार केला जाणार नाही.

**सही/-**
**(डॉ. भावना पाटोळे )**
**संचालक,राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था,मुंबई**
**तथा समन्वयक, एकत्रित सामायिक प्रवेश परीक्षा**